# अवघ्या 50 कि.मी. अंतरात 200 रुपयांचा भुर्दंड

■ नांदगाव पेठनंतर निंभी टोल नाक्यावर वाहनधारकांची लूट

■ दहा किलोमीटर अंतरावर भरावा लागतो दुहेरी टोल

महासागर प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.16 )–** अमरावती ते मोर्शी अंतर जवळपास 54 किलोमीटर आहे. परंतू या अंतरादरम्यान चारचाकी वाहनधारकांना 200 रुपयांचा भुर्दंड सोसावा लागत आहे. नांदगाव पेठ टोल नाक्यानंतर आता निंभी टोल नाक्यावर वाहनधारकांची लूट होत आहे. येथुन दहा किलोमीटर अंतरावर निंभी येथे आठ दिवसापूर्वी सुरू झालेल्या राष्ट्रीय महामार्ग 353 के वर वाहनधारकांची आर्थिक लुटमार सुरू असून त्यावर पायबंद करण्यात यावा अशी या परिसरातील त्रस्त वाहनधारकांची मागणी आहे. मागणी मान्य न झाल्यास त्रस्त वाहनधारकांनी आंदोलनाचा इशारा दिलेला आहे.

सविस्तर वृत्त असे की मोर्शी ते अमरावती या 54 किलोमीटर दरम्यान यापूर्वी नांदगाव पेठ येथे एक टोल नाका आहे, जेथे वाहनधारकांना 140 रुपयांचा टोल भरावा लागतो. आता पुन्हा नवीन एक टोल नाका मोर्शी ते अमरावती या राष्ट्रीय महामार्गावर मोर्शी पासून दहा किलोमीटर अंतरावर निंभी येथे सुरू करण्यात आला आहे. दोन टोल नाक्यांमधील अंतर 35 किलोमीटर पेक्षा कमी आहे. चार चाकी वाहन धारकास केवळ टोल नाका ओलांडावयाचा असेल तर जाताना 40 आणि परत येताना वीस रुपये चार्जेस आकारले जातात. एका महिन्याची पास काढावयाचे असल्यास 340 रुपये दर आकारल्या जातो. परंतु प्रत्येकाला दररोज जाणे येणे करावे लागत नाही. त्याला विनाकारण 60 रुपयाचा खर्च आहे आणि नांदगाव पेठ येथे वेगळा टोल भरावा लागेल.

एकंदरीत वाहनधारकांची आर्थिक लूट केल्या जात आहे.खरंतर सरकारवर मोर्शी मधील सर्व जनतेने भारतीय दंड संहितेनुसार आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करायला पाहिजे असे अ‍ॅड. आशिष टाकोडे यांचे मत आहे.




## प्रवासी वाहन चालकांवर संकट

मोर्शी शहरामध्ये एक चालक-मालक संघटना आहे आणि त्यांचा उदरनिर्वाह हा मोर्शी ते अमरावती पॅसेंजर ला नेणे आणणे करणे हा आहे. दिवसाला ते सर्व खर्च काढता पाचशे सहाशे रुपये कमवितात व आपला उदर निर्वाह करतात. मात्र त्यांना आता दोन टोल टॅक्स भरावे लागणार आहे. संपूर्ण कमाई त्यांची टोल नाक्यामध्येच गेली तर ते आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करतील ? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. त्यांना आता आपल्या गाड्या विकल्याशिवाय पर्याय उरणार नाही. त्यांच्यावर आता बेरोजगाराची वेळ येऊ नये म्हणून तसेच मोर्शी शहरातील सर्वसामान्य जनतेवर सुद्धा अतिरिक्त निंभी टोलचा आर्थिक भूर्दंड बसत आहे. त्यामूळे हा निंभी चा टोल लवकरात लवकर बंद करण्यात यावा नाहीतर आम्हाला जनहितासाठी जन आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही आणि या जनआंदोलनामध्ये कोणत्याही व्यक्तीसोबत काही कमी जास्त झाले तर याला सर्वस्वी संबंधित मंत्री व सरकार जबाबदार राहील. असा इशारा माजी नगराध्यक्ष आप्पा गेडाम, माजी नगरसेवक हर्षल चौधरी, शेखर गावंडे, अभिषेक धानोरकर, लोकेश गोमकाळे, अनिकेत राऊत, एड. आशिष टाकोडे, दिनेश मिश्रा, रवींद्र हिरुडकर, सुधीर बेले, अमोल फंदे इत्यादींनी दिला आहे.



# राज्यभरातील कार चोरणाऱ्या चोरटा पुलगावातून जेरबंद

■ खरेदीदार आणि भंगारवाल्यालाही अटक

■ 3.36 लाखांचा माल जप्त, एलसीबीची कारवाई

■ अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) –** राज्यभरातून टाटा कंपनीच्या इंडिका, इंडिका व्हिस्टा व इतर चारचाकी वाहने चोरणाऱ्या एका चोरट्याला ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथून अटक केली. तसेच कार विकत घेऊन ती स्क्रॅप करणाऱ्या भंगार व्यापाऱ्यालाही अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी आरोपींकडून 3.36 लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. प्रफुल्ल उर्फ बबलू गजानन गंगेकर (35, भारत नगरी, यवतमाळ) असे चोरट्याचे नाव असून, चोरीची वाहने खरेदी करणारा सैफुद्दीन इजाजुद्दीन खान (28, आझाद नगर, नई वस्ती टेका, नागपूर) आणि भंगार विक्रेता मोहम्मद रा. एहतेशम उर्फ अत्तू मोहम्मद. इरफान (32, मोमीनपुरा, नागपूर) यालाही अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम, नितीन इंगोले, मुलचंद भांबूरकर, अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसंगडे, दिनेश कनोजिया , सुनील महात्मे , निलेश डांगोरे , आणि सायबरचे सागर धपाड , रितेश वानखडे , चेतन गुल्हाने, गुणवंत शिरसाठ, चालक अमलदार सजय प्रधान, हर्षद घुसे यांनी केली.

### घुईखेड येथील घरासमोरून चोरीला गेली कार

3 डिसेंबर 2024 रोजी रात्री धामणगाव रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील सचिन किसनराव वरघाट (34) यांच्या घरासमोरून अज्ञात आरोपीने टाटा कंपनीचे इंडिगो ईसी वाहन क्रमांक एम एच 40/के आर 9750 चोरून नेले होते. ज्याची तक्रार तळेगाव दशासर पोलिस ठाण्यात करण्यात आली. लोणी पोलिस ठाण्यातही अशीच तक्रार नोंदवण्यात आली होती. वाहन चोरीची घटना गांभीर्याने घेत पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी या टोळीला जेरबंद करण्याचे आदेश ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांना दिले होते.

### पुलगावच्या नाचणगाव चौकातून अटक

ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे उपविभागाचे पोलिस उपनिरीक्षक मो. तस्लीम व दर्यापूर उपविभागाचे पोलिस उपनिरीक्षक नितीन इंगोले यांचे पथक समांतर चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करीत होते.

यावेळी हा गुन्हा यवतमाळ जिल्ह्यातील भारत नगरी येथील रहिवासी चोर प्रफुल्ल गजानन गंगेकर याने केल्याची गोपनीय माहिती मिळाली. तो सध्या वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथे राहत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी पुलगाव येथे जाऊन प्रफुल गंगेकरला नाचणगाव चौकातून अटक केली.

### सैफुद्दीन चोरीची वाहने खरेदी करायचा

नागपुरातील आझाद नगर येथे राहणारा सैफुद्दीन खान चोरीची वाहने खरेदी करतो. प्रफुलने तळेगाव आणि लोणी येथून चोरी केलेल्या इंडिका कार सैफुद्दीनला विकल्या होत्या. त्यापैकी इंडिका व्हिस्टा क्रमांक एमएच 27 एसी. 6022 जप्त करण्यात आली आहेत. दुसरी कार भंगार व्यावसायिक मोहम्मद यांना देण्यात आली. एहतेशाम उर्फ अंतू मोहम्मद इरफानला स्क्रॅप करण्यासाठी देण्यात आली. पोलिसांनी दोघांना अटक केली. मोहम्मदकडून कारचे चेसीस नंबर आणि स्क्रॅप केलेले भाग जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून 3 लाख 36 हजार रुपयांचा माल, इंडिका व्हिस्टा क्रमांक एमएच 27/एसी 6022 किमतीचे एक लाख 50 हजार रुपये, वाहन चोरीचे साहित्य, दोन मोबाइल फोन, भंगार वाहनाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### 6 वाहन चोरीची कबुली

चोरीबाबत प्रफुल्ल गंगेकर याच्याकडे चौकशी केली असता त्याने तळेगाव दशासर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घुईखेड गावातून 1, लोणी येथून 1, बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून 2, अवधूतवाडी पोलद्दस ठाण्याच्या हद्दीतून 2 अशा एकूण 6 वाहनांची चोरी केल्याची कबुली दिली.



# संविधानाची विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

**भारतीय बौद्ध महासभेची मागणी**

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.16 ) –** परभणी येथील संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याच्या घटनेनंतर आंबेडकरी व बौध्द समाज बांधव आक्रमक झाले आहे. सोमवारी( दि.16) भारतीय बौद्ध महासभेने जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने केली. तसेच संविधानाची विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाच्या कायद्या नुसार कठोर कारवाई करावी,अशी प्रमुख मागणी केली. यासह अन्य मागण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन दिले.

परभणी जिल्ह्याचे पोलीस अधिकारी व प्रशासनाला जाग यावी,यासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन करण्यात येतो असतांना निरपराध नागरिकांना द्वेष भावनेतून अमानुष मारहाण करण्यात आली. त्यामुळे मारहाण करणार्या पोलिसांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. कोंबिंग ऑपरेशन थांबविण्यात यावे. निर्दोष महिलांवर, तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तत्काळ मागे घेऊन त्यांची सुटका करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी बौद्ध महासभेने निवेदनात दिला आहे. यावेळी भारतीय बौध्द महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार, जिल्हाध्यक्ष विलास मोहाडे, राहुल मेश्राम, गणपत तिडके, सिद्धार्थ भोजने, एन व्ही वालोंद्रे , प्रा. प्रकाश बोरकर, आनंद इंगळे, रवींद्र गेडाम, विश्वास दंदे ,बेबी वालोंद्रे, रामेश्वर गावंडे, रंजना इंगळे,वंदना ढाणके यांच्यासह बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वनविभागाने बेरोजगारांना दिला रोजगार

## साहसिक खेळांचे पर्यटकांना आकर्षण

**अमरावती –** वनविभागाने आमझारी अ‍ॅडव्हेंचर वर्ष 2021 पासून सुरू केला आहे. आमझरी व नजिकच्या सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील या उद्देशाने हा प्रकल्प सुरू केला होता. सध्या जवळपास चाळीस बेरोजगार युवकयुवतींना रोजगारांच्या संधी प्राप्त झाली आहे. सध्या पर्यटकांसाठी चिखलदरा येथील भीमकुंड येथे देखील या प्रकारचे अ‍ॅडव्हेंचर उपलब्ध करून देण्यात आले आहे. तस पाहीले तर गेल्या पाच वर्षांपासून पर्यटकांना ‘स्यकॉक’ची उत्सुकता असून, त्याची प्रतीक्षा करीत आहेत. वनविभागाच्या वतीने आमझरी व भीमकुंड येथे साहसीक खेळांची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र बनले असून, त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. विशेष म्हणजे ऑगस्ट 2021 पासून पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या या अ‍ॅडव्हेंचरमध्ये झीप लाइन, रोप साईकल, वॉल क्लइम्बिंग, बंजी झुला, ट्रेकींग आणि रोप वे आदींचा समावेश आहे. याचे युवा पर्यटकांना विशेष आकर्षण आहे. तर लहान मुलांसाठी स्लायडर, झुला, तसेच अन्य आकर्षक व सुविधाजनक आणि सुरक्षित खेळ उपलब्ध आहेत. त्यामुळे पालक दखिल निच्छिंत असून, लहान मुलेसुध्दा आनंदी असतात. विशेष म्हणजे ऑगस्ट 21 मध्ये आतापर्यंत वनविभागाने जवळपास 28लाख रूपयांची कमाई या साहसिक खेळांच्या माध्यमातून केली आहे. त्यासोबतच प्रशिक्षित बेरोजगारांना या कमाईतील 76 टक्के वितरीत करून उर्वरित रक्कम साहसिक खेळांच्या साहित्यांच्या देखभालीसाठी ठेवण्यात आली आहे. बहुतांश पर्यटक हे या साहसिक खेळासाठी विकएंडला येतात त्यामध्ये जवळपासचे तसेच दुरच्या पर्यटकांचा समावेश आहे.

# ऑटोच्या धडकेत जखमी झालेल्या जखमीचा मृत्यू

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) –** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गोपाल नगर परिसारातील राजेंद्र नगरमध्ये घरासमोरून पायी जात असलेल्या एका व्यक्तीला ऑटोने धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

रवींद्रराव राऊत (55) असे मृताचे नाव आहे. मुलगा वैभव राऊतच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी ऑटोचालक योगेश बुटेकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राजेंद्र नगर येथे राहणारा वैभव राऊत हा घरासमोर उभा होता. तेव्हा वडील रवींद्रराव घरासमोरून चालले होते. यावेळी ऑटोचालक योगेश बुटेकर याने भरधाव वेगात व बेदरकारपणे ऑटो चालवत रवींद्ररावला धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना ऑटोमध्ये बसवून खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नागपूरला रेफर करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान रवींद्रराव राऊत यांचा मृत्यू झाला. वैभव राऊत यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी ऑटोचालक योगेश बुटेकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# एसटी बस चालकाने प्रवाशाच्या पायाची बोटे चिरडली

**मध्यवर्ती बस आगारातील घटना ■ कुटुंबियांनी खासगी रुग्णालयात उपचाराची केली मागणी**

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) –** अमरावती जिल्हा मध्यवर्ती बसस्थानकात सोमवारी दुपारी चार वाजता एसटी आगारात येणाऱ्या बसने एका प्रवाशाच्या पायाची बोटे चिरडली. या घटनेमुळे घटनास्थळी प्रवाशांची गर्दी झाली होती. कुटुंबीय व इतर नागरिकांच्या मदतीने जखमी व्यक्तीला इर्विन रुग्णालयात आणण्यात आले. जिथे त्याची दुखापत गंभीर असल्याने त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्याची मागणी कुटुंबीयांनी आगार प्रशासनाकडे केली होती.

भगवान आनंदराव वानखडे (65, सरसी पोटोदा, नांदगाव खंडेश्वर) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सरसी पोटोडा येथील रहिवासी भगवान वानखडे हे सोमवारी दुपारी पत्नीसह अमरावती बस डेपो परिसरात आले होते व ते एका बाजूला उभे होते. दरम्यान, भंडारा येथील तुमसर आगारातून एमएच 14/8668 क्रमांकाची बस भरधाव वेगात आगाराच्या दिशेने येत होती. दरम्यान, चालकाने बेदरकारपणे बस चालवून भगवान वानखडे यांच्या पायाची बोटे चिरडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक कृष्णा पारधी आणि वाहक भीमराज जीवतोडे हे एसटीमध्ये होते,अशी माहिती आहे. काही वेळातच नागरिकांची गर्दी घटनास्थळी जमा झाली. कुटुंबीय व इतर प्रवाशांच्या मदतीने भगवान वानखडे यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पायाचा पंजा चिरडल्यामुळे भगवानच्या पायाची बोटे पूर्णपणे चिरडली होती. जास्त रक्तस्त्राव झाल्याने पायाभोवती बांधलेला स्कार्फही रक्ताने माखला होता. जखमी भगवानसह एसटी वाहकही रुग्णालयात पोहोचले. जखमी भगवान यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. मात्र भगवान यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्याची मागणी कुटुंबीयांनी मध्यंवर्ती बस आगार प्रशासनाकडे केली होती. मात्र, बस आगार कर्मचाऱ्यांनी नुकसान भरपाईचे फॉर्म भरून वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन करून निर्णय घेण्यास सांगितले होते.

> भगवान वानखडे यांचा अपघात झाला आहे. आम्ही त्यांना सध्या फारशी मदत करू शकत नाही. आम्ही त्यांच्या एमआयआर, सीटी स्कॅनची बिले भरू शकतो. मात्र उपचारानंतर जी बिले भरपाई फॉर्मसोबत जोडली जातील ती बिले महामंडळातर्फे अदा करण्यात येतील.
>
> **नीलेश बेलसरे,**
> **विभागीय नियंत्रक, एसटी आगार**

# राष्ट्रीय लोक अदालतीत 8 हजार 805 प्रकरणांचा निपटारा

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 )–** अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय येथे 14 डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. एकूण 8 हजार 805 प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आला.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, दिवाणी व फौजदारी प्रकरणे, बँकेचे प्रलंबित प्रकरणे, चेक न वटवल्याची प्रकरणे (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट) भुसंपादन प्रकरणे, विवाहासंबंधी कायद्याचे दावे, बँकेचे तसेच दिवाणी आणि फौजदारी अपील व इतर दिवाणी प्रकरणे संबंधीत दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी लोक अदालतीसमक्ष ठेवण्यात आली होती. एकूण 8 हजार 805 प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आला. लोकअदालती मध्ये ठेवलेल्या प्रकरणांची पूर्तता करण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकूण 46 मंडळ (पॅनल)ची निर्मिती करण्यात आली होती. यामध्ये न्यायाधीश, अधिवक्तागण तसेच न्यायालयीन कर्मचारी यांचा समावेश होता. जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित प्रस्तुत लोकअदालतीला चांगला प्रतिसाद मिळाला. या लोक अदालतीमध्ये संपूर्ण जिल्ह्यातून 47 हजार 983 दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 4 हजार 217 प्रकरणांचा तर एकूण 13 हजार 167 प्रलंबित प्रकरणांपैकी 2 हजार 226 प्रकरणे अशा एकुण 6 हजार 443 प्रकरणांचा यशस्वीरित्या निपटारा करण्यात आला. राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमांतून एकुण 13 कोटी 85 लाख 855 रूपये तडजोडीच्या रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झाला. यावेळी उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे 9 ते 13 डिसेंबर या अंतर्गत विशेष मोहिम राबविण्यात आली होती. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सुधाकर वें. यार्लगड्डा, मंगला कांबळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव, न्यायाधीश, जिल्हा वकील संघातील सदस्य आदी यावेळी उपस्थित होते.



# बच्छराज प्लॉटमध्ये कार जळून खाक

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) –** शहरातील रहदारीच्या मार्केट परिसरातील बच्छराज प्लॉटमध्ये सोमवारी( दि.16) दुपारी तीन वाजता च्या दरम्यान एका कारला अचानक आग लागली. या आगीत कार क्रमांक एम एच 27 डी ई 94 22 जळून खाक झाली. जवळील गवताला बिडी किंवा सिगरेट मुळे आग लागली आणि ती आग कार पर्यंत पोहोचल्यामुळे पाहता पाहता कारचा समोरील भाग जळून खाक झाला.

या घटनेची माहिती तत्काळ महापालिकेच्या अग्निशमन विभागाला देण्यात आली. अग्निशमन विभागाचे फायरमॅन विकी हिवराळे, श्याम बोबडे, चालक कासिम अहमद तत्काळ घटनास्थळी अग्निशमन बंब घेऊन दाखल झाले.

त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. आगीच्या भक्षस्थानी पडलेली कार क्रमांक एम एच 27 डी ई 94 22 ही सुधीर गणेडिवाल यांच्या मालकीची असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांनी आपले वाहन परिसरातील एका झाडाजवळ उभे केले होते. दरम्यान तेथे अज्ञात व्यक्तीने बिडी किंवा सिगरेट ओढून ती अर्धवट जळालेल्या अवस्थेत गवतावर फेकून दिली. त्यामुळे गवताला आग लागून त्या आगीने तेथे असलेल्या कारला देखील आपल्या कवेत घेतले. आगीमुळे कार अर्ध्यापेक्षा जास्त जळून खाक झाली होती. दरम्यान या घटनेनंतर परिसरात



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पारा घसरला : किमान तापमान 10.6 डिग्री सेल्सिअस

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** - शहरासह जिल्ह्याच्या तापमानात दिवसेंदिवस कमालीची घट होत असून थंडीचा कडाका चांगलाच वाढत आहे. वातावरणात दिवसभर थंडी राहत असल्यामुळे जनजीवनावरही चांगलाच परिणाम होत आहे. सोमवारी (दि.16) दररोज पेक्षा थंडीचा पारा चांगलाच घसरलेला दिसून आला. प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या माहिती नुसार, अमरावतीचे किमान तापमान 10.6 डिग्री सेल्सिअस नोंदविल्या गेले. त्यामुळे शहरासह जिल्ह्यात हुडहुडी भरणारी थंडी सध्या जाणवत आहे. डिसेंबर महिन्यात पारा चांगलाच घसरल्याने दिवसभर वातावरणात थंडी जाणवत आहे.नागरिक दिवसाही स्वेटर घालून थंडीपासून बचाव करित असल्याचे दिसून येत आहे.



हवामान केंद्राच्या दैनंदिन अहवालानुसार शनिवारी व रविवारी देखील तापमान घसरल्याची नोंद होती. सोमवारी देखील जिल्ह्याचे सरासरी किमान तापमान 10.6 अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले गेले. येत्या काही दिवसात ही थंडीची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. थंडीपासून बचावाकरिता नागरिक आता सायंकाळपासून शेकोटीचा आधार घेत आहे. या थंडीचा आरोग्यावरही परिणाम होतांना दिसत आहे. जिल्ह्यात सर्दी, खोकला, ताप या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ होऊ लागली आहे. रुग्णालयांमध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. थंडीच्या लाटेमुळे अकाली ताप आणि व्हायरल इन्फेक्शन होण्याची शक्यता जास्त असते. थंडीच्या लाटेपासून बचावाकरिता नागरिकांनी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.उबदार कपडे घालण्याचे आणि विशेषत: वृध्द आणि लहान मुलांची काळजी घेणे गरजेचे आहे.

### धारणी चे तापमान 7 अंशाच्या

थंडीच्या लाटेचा परिणाम जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अधिक दिसून येत आहे. सकाळी व रात्री तापमानात कमालीची घट झाली आहे. विशेषत: मेळघाटातील चिखलदरा आणि धारणी तालुक्यात किमान तापमान 7 अंशाच्या आसपास आहे. थंडीच्या लाटेमुळे स्थानिक नागरिकांना बचावासाठी विशेष खबरदार घ्यावी लागत आहे. पुढील आठवडाभर अमरावती जिल्ह्यात थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# आयुष मंत्री प्रताप जाधव यांना पान पिंपरी उत्पादक शेतकऱ्यांचे साकडे

## देहराडून येथील आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनात निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.16 )**- संपूर्ण देश भरात आयुर्वेदात महत्व असलेली वन औषधी, व त्यापासून असणारे उत्पादने ह्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य बाजार पेठ मिळावी तसेच देशातील प्रमुख वन औषधी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या औषधी पिकाला भाव मिळावा, तसेच वन औषधी पिकाला भविष्यात चालना मिळावी ह्यांदृष्टीने आयुष मंत्रालय दिल्ली ह्यांचे वतीने दरवर्षी आंतरराष्ट्रीय प्रदर्शनी ठेवण्यात येत असते, त्या अनुषंगाने ह्यावर्षी देहराडून येथे दि.12 ते 15 डिसेंबर दरम्यान उत्तराखंड, देहराडून येथील परेड ग्राऊंड वर कृषी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. ह्यामध्ये प्रकल्प संचालक आत्मा च्या अर्चना निस्ताने ह्यांचे मार्गदर्शनातं अंजनगाव सुर्जी येथील नागार्जुना पान पिपरी उत्पादक संस्थेचे संचालक शेतकरी ह्यांनी प्रदर्शनीत भाग घेतला होता. ह्याप्रसंगी कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून असलेले केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव ह्यांना महाराष्ट्रातील पान पिपंरी उत्पादक शेतकऱ्यांचे गेली चार वर्षापासून चे प्रलंबित असलेले अनुदान, व आंतर राष्ट्रीय स्तरावर योग्य बाजार भाव मूल्य मिळावे ह्यासाठी शासनाने सर्वतोपरी मदत करावी ह्यासाठी संचालक कमलंकांत लाडोळे, मनोहर मुरकुटे, नंदकिशोर आवंडकर, ज्ञानेश्वर सुने, मनोहर भावे, सुभाष थोरात, प्रल्हाद राऊत, धीरज वानखडे ह्यांनी आयुष मंत्री प्रतापराव जाधव ह्यांना निवेदन सादर केले व सविस्तर अशी चर्चा केली, ह्याप्रसंगी प्रलंबित प्रश्नावर त्वरित उपाययोजना करून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांना दिले.

# तपोवन प्रभागात अनियमित व कमी दाबाचा पाणी पुरवठा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.16 )**- तपोवन प्रभागात कमी दाबाच्या तसेच अनियमित पाणी पुरवठा होत आहे. या विरोधात सोमवारी (दि.16) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात शिवसेनेकडून आंदोलन करण्यात आले. यावेळी तीव्र निदर्शने करून निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे पाणी देण्याचे धोरण हे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे तपोवनमधील रहिवासी नागरीकांना डोकेदुखी ठरत आहे. तपोवन परिसरातील रहिवासी नागरीक नियमित पाणी बिले भरत आहेत. तसेच पाण्याची मुबलकता असूनही तपोवन प्रभागावर मजीप्रा जाणीव पूर्वक अन्याय करीत असल्याचे सर्व नागरीकांमध्ये बोलल्या जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. नव्याने आखलेल्या पाणी सोडण्याच्या कालावधीमध्ये वाढ करुन कमीत कमी पाच तास पाणी देऊन पाण्याची तीव्रता वाढवून त्यात सुधारणा करण्यात यावी. तपोवन प्रभाग हा मागील दहा वर्षाच्या तुलनेत विकसित होत असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नवीन घरे, वसाहती कॉलनी, नगर तसेच म्हाडा घरकुल योजना आदी सारख्या नागरी वस्त्या वाढल्या आहेत. तीन ते चार इंचाच्या जुन्याच पाईपलाईन द्वारे पाणी पुरविण्यात करण्यात येत आहे. त्यामुळे आगामी 10 ते 15 दिवसात तपोवन प्रभागातील पिण्याच्या पाण्याची समस्या आपण तात्काळ सर्वे करुन निकाली काढवी. या मागणीला घेऊन विद्यापीठ शिवसेना विभाग प्रमुख मोहन क्षीरसागर यांच्या नेतृत्वात मजीप्रा अभियंत्यांना निवेदन दिले. यावेळी प्रतिक डुकरे, शैलेंद्र डहाके, प्रशांत काळे, संजय बुंदेले, नरेंद्र भालेराव , जीवन मेश्राम, राजू सांगळे, संतोष मोरे यांच्यासह अन्य शिवसैनिक उपस्थित होते.

### पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आज

**अमरावती**- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती तर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन उद्या , मंगळवार , दि. 17 डिसेंबर, 2024 रोजी होणार आहे.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी आजपासून

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.16 )** - तालुक्यातील कारला येथील सखारामजी खरबडे विद्यालयात दि.17 व 19 डिसेंबर 2024 दरम्यान तीन दिवसीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण विभाग पंचायत समिती चांदूर रेल्वे, तालुका मुख्याध्यापक संघ, विज्ञान अध्यापक मंडळ, सखारामजी खरबडे विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या तीन दिवसीय तालुका विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

विज्ञान प्रदर्शनातील प्रतिकृतींची मांडणी दिनांक 17 डिसेंबर रोजी होणार आहे. प्रदर्शनीचे उद्घाटन 18 डिसेंबर रोजी सकाळी 11 वाजता सिपना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय खेरडे यांचे अध्यक्षतेखाली शिक्षणाधिकारी (माध्य) प्रिया देशमुख ह्या करणार आहे. यावेळी आ.प्रताप अडसड, आ.सुलभा खोडके, विभागीय शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष संजय गणोरकर, उद्योजक संदीप गिरासे यांची विशेष उपस्थिती राहणार असून महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुण धनोकर, उपाध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण वानखडे, सचिव दिगांबर यावतकर, सहसचिव प्रा. किसन मेहरे, सदस्य संजय हुसे, नितीन हिंगणे, शाळा समिती अध्यक्ष मधुकर आखरे, गटविकास अधिकारी तेजश्री आवळे, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रवीण दिवे, सचिव प्रदीप नानोटे, सहसचिव ललित चौधरी, पंचायत समिती माजी सभापती संजय ठाकूर, कारला सरपंच प्रमोद कुमरे शिक्षण विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दि.19 डिसेंबर रोजी दुपारी 2 वाजता बक्षीस वितरण तथा समारोप कार्यक्रम होणार आहे.

**कारला येथे 19 डिसेंबर पर्यंत आयोजन**

# वाढदिवसानिमीत्त फळाचे वाटप




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.16 )** - येथील ॲड.आशिष टाकोडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे जनसेवा ग्रुप द्वारे रुग्णांना पोषक आहार म्हणजे केळी, दूध, बिस्किटाचे वितरण करण्यात आले.

हा कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाला प्रामुख्याने कृष्णा वाघमारे, बाबुराव पडोळे, तुषार पोहकार, ॲड. बंडू श्रीराव, नरेंद्र गोहाड, मनीष चौधरी, रमाकांत गावंडे, मयूर पाटील, देवा कुरवाडे, सुजित वानखडे, सरिता बुरंगे, भारती महाजन, राहुल पंडागळे, ॲड. स्वराज श्रीराव, प्रकाश कांबळे, नागोराव खडसे, मीनाक्षी मेश्राम तसेच उपजिल्हा रुग्णालय येथील संपूर्ण स्टाफ प्रामुख्याने उपस्थित होता.

# शहरातील न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.16 )**- महाविद्यालयाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन शहरातील चुडामण नदीच्या तिरावर असलेल्या न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कुल व उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालयात स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंत्युत्सवाचेही आयोजन महाविद्यालयात करण्यात आले आहे. आयोजकांनी पत्रकार परिषदेतून आयोजनाची माहिती दिली.



न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या मुख्याध्यापीका तथा प्राचार्य तारकेश्वरी सायर यांनी माहिती देतांना सांगितले की. इ.सन. 1924 मध्ये शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांसाठी प्रवाहित करणारे भगिरथ महात्मा ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने प्रेरीत होऊन वरूड तालुक्याच्या पंचक्रोशीत गोर-गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून वरूड भागातील काही दानशूर शिक्षण प्रेमी व्यक्तींनी 1 जुलै 1924 रोजी एडेड स्कूल या नावाने शाळा सुरू केली. नंतर एम. डी. स्कूल या नावाने ती शाळा ओळखल्या जावू लागली. या संस्थेव्दारा त्याकाळातील विद्याविभूषीत तरूण संचालक वर्गानी या पहील्या ज्ञान संकुलाच्या दर्जेदार शिक्षणासाठी आपले ज्ञान व कौशल्य पणाला लावले. अवघ्या काही वर्षातच हा ज्ञानरूपी वृक्ष बहरास आला. नंतर स्थानिक संस्था संचालकांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या कार्याने प्रभावित होऊन 1945 मध्ये एम.डी. हायस्कूल हे श्री शिवाजी संस्था, अमरावती ला दान करून दिले. त्यानंतर न्यू इंग्लीश हायर सेकंडरी स्कुल या नावाने ही शाळा वरूड शहर व तालुक्यात ओळखल्या जावू लागली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आशिर्वादाने न्यू इंग्लिश हायस्कूलचा उत्तरोत्तर विकास झाला. या शाळेचे अनेक माजी विद्यार्थी साहित्य, कला, विज्ञान, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकारिता व राजकीय क्षेत्रात उत्तम कार्य करीत आहे. यावर्षी शाळेला 100 वर्षे पूर्ण झालेली आहे. सोबतच शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा 126 वा जयंती उत्सव, स्नेह संम्मेलन, माजी विद्यार्थी मेळावा व शाळेचा शताब्दी महोत्सव 22 ते 28 डिसेंबर 2024 पर्यंत साजरा करण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजीत पत्रकार परिषदेतुन प्राचार्य तारकेश्वरी सायर तथा माजी विद्यार्थी डॉ. निलकंठ यावलकर, डॉ.विजय देशमुख, डॉ. राजेंद्र राजोरीया, अनिल वऱ्हेकर, अनिल देशमुख यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना केले.

# खानापूर येथे पीक विमा शिबीर



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.16 )**- खानापूर येथे भारतीय जनता पक्ष, ग्रामंचायत खानापूर व रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी तर्फे रब्बी हंगामातील गहू, चना, कांदा या पिकांचा पीक विमा नि:शुल्क (फ्री) मध्ये काढून देण्यासाठी कॅम्पचे आयोजन केले होते. या कॅम्पला महिला शेतकरी अरुणा खडसे यांचा विमा काढून सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने विमा काढावा विमा निःशुल्क असला तरी महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांच्या विम्याचे 4600 कोटी शेतकऱ्यांच्या करिता विमा कंपनीकडे भरतात याचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन भारतीय जनता पक्ष जिल्हा उपाध्यक्ष प्रविण राऊत यांनी केले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी त्यांना मदत केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. सरपंच उपसरपंच सदस्य व विमा प्रतिनिधी सूरज कोंडे, राजेश कळमकर व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या हस्ते अटल दौडचे टीझर लॉन्च

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.16 )** - माजी पंतप्रधान भारतरत्न स्व अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने अटल दौड हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे टीझर (Teaser) लॉन्च पद्मश्री श्री प्रभाकरराव वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. ‘अटल दौड मॅरेथॉन स्पर्धा’ ही तीन वर्षापासून अंबानगरीमध्ये घेतली जात आहे. अतिशय उत्साही वातावरणात ही स्पर्धा पार पडते. यंदा या स्पर्धेमध्ये 5 हजार स्पर्धक भाग घेण्याची शक्यता आहे. या स्पर्धेमुळे भारतीय खेळाडूंच्या उत्साहात आणि चैतन्यात नेहमीच भर पडली आहे. अमरावती मधील क्रीडा प्रेमींनी या मॅरेथॉन मध्ये सहभागी होऊन एकूणच अमरावतीचं आरोग्य आणि एकात्मता अबाधित राखण्यात या स्पर्धेचा महत्त्वाचा वाटा असल्याचे मत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी केलं. यावेळी संपूर्ण मॅरेथॉन स्पर्धाची माहिती मुख्य आयोजक तुषार भारतीय यांनी सांगितली. टीझर लॉन्च सोहळला प्रा.रवींद्र खांडेकर, प्रा.माधुरी वैद्य, माजी महापौर चेतन गावंडे, प्रशांत शेंगोकर, प्रा.अतुल पाटील, सचिन मोहोड, राजेश जगताप, मंदार नानोटी, देव कुलकर्णी, जितेश भुजबळ प्रामुख्याने उपस्थित होते.



# पत्रकार दिन नियोजन सभा




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.16 )**- मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघाची बैठक रुपेश खोडस्कर यांच्या अध्यक्षतेखाली दि.11 डिसेंबर 2024 ला येथील पातुरकर कॉम्प्लेक्स मधील पत्रकार संघाच्या कार्यालयात पार पडली. आगामी 6 जानेवारी रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ आयोजित पत्रकार दिनाच्या नियोजनाकरिता या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीमध्ये 6 जानेवारी पत्रकार दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासंदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली. यामध्ये हिवरखेड येथील बिगीनर इंग्लिश स्कूल मध्ये पत्रकार दिन साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमांमध्ये घरोघरी वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात येणार आहे. पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार केल्या जाईल. तसेच पत्रकारीता विषयक वरिष्ठ पत्रकारांचे व्याख्यान तथा वृत्तपत्र क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांचा सत्कार आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या बैठकीला मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघटनेचे संघाचे अध्यक्ष गोपाल डहाके, उपाध्यक्ष नरेंद्र निकम, उपाध्यक्ष गजानन ढोंगे, सचिव राहुल मंगळे, सहसचिव जितेंद्र फुटाणे, कोषाध्यक्ष त्र्यंबकराव संभावित, मार्गदर्शक बाळू इंगळे, सदस्य रुपेश खोडस्कर, विजय सुने, विशाल पितळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.